सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 364 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 23 / 09 / 2025

# 1)जबरी चोरी :–

**विमानतळ :–** दिनांक 20.09.2025 रोजी 19.00 वा चे सुमारास **बाफना रोडवर सखोजी नगर नांदेड,** येथे, यातील फिर्यादी हे त्यांचे मोटार सायकल वर गावी जात असताना आरोपी 1.अमन लंगीरा, वय.35 वर्षे, रा.अबचलनगर नांदेड 2. लवली महाराज,वय 38 वर्षे.रा.नंदीग्राम सोसायटी,3.पाली महाराज,वय.32 वर्षे.व इतर एक यांनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहान करून फिर्यादीचे हातातील 06 ग्रॅम सोन्याची अंगठी व खिशातील नगदी 10,000/–रू जबरीने चोरून नेले **व** जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मारूती सिताराम देशमुख, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. पिंपळगाव ता.जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ गुरनं 382/2025 कलम 309(6),137(2), बीएनएस–2023** कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/जोंधळे, मो. नं. 9175324824** हे करीत आहेत.सदर गुन्हातील सर्व आरोपींवर अटकेची कार्यवाही करण्यात आली असुन अधिक तपास सुरू आहे.

# 2)गंभीर दुखापत :–

**लिंबगाव :–** दिनांक 21.09.2025 रोजी रात्री 20.00 वा. चे सुमारास, **रॉयल बार पुयणी, ता.जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे जेवन करत असताना बार मालक लक्ष्मण टेकाळे यांना चपाती करपलेली आहे. बदलुन दया असे म्हणाले असता आरोपी नामे 1.लक्ष्मण टेकाळे, 2.राजेश हरबळे, 3.सुरेश शिंदे, 4.माधव सर्व रा. रॉयल बार पुयणी नांदेड, यांनी संगनमत करून फिर्यादीस लोंखडी रॉडने डोक्यास, हातावर, मानेवर, मारहाण मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी किशन एकनाथ जोगदंड, वय 40 वर्षे, रा.निळा जि नांदेड.** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव गुरनं 164/2025 कलम 118(2),352,351(2),351(3),3(5),बीएनएस–2023 कायदा** प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/ सय्यद, मो.नं.** 9373545955 हे करीत आहेत.

# 3)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :– मा. श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी **स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते.** त्या अनुषंगाने दिनांक 22.09.2025 रोजी 21.10 वा. चे सुमारास, **लेबर कॉलनी, सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे प्रशिक मिलीद केळकर, वय 21 रा. लेबर कॉलनी नांदेड हा विना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी खंजर किंमत 600/–रू ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/793 उमेश प्रकाश आकोसकर, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 354/2025 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/579 फुलारी, मो.क्रं. 9860809579** हे करीत आहेत.

# 4)प्रोव्हिबिशन :–

**1)इस्लापुर :–** दिनांक 21.09.2025 रोजी 18.25 वा. चे सुमारास,**मौ. सावरगांव तांडा ता.किनवट जि.नांदेड येथे,** यातील महिला आरोपी नामे चंद्रकला रामलु जाधव, वय 45 वर्षे, रा. सावरगांव तांडा ता.किनवट जि.नांदेड ही विना परवाना बेकायदेशिररीत्या सिंधी दारू किंमत 3850/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेली मिळून आली. वगैरे **फिर्यादी पोकॉ/456 ओमप्रकाश लक्ष्मणराव डिडेवार, ने. पोस्टे इस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 116/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/658 केंद्रे,** मो. नं. 9823625150 हे करीत आहेत.

**2)इस्लापुर :–** दिनांक 21.09.2025 रोजी 17.50 वा. चे सुमारास,**मौ. सावरगांव तांडा ता.किनवट जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे विष्णु भिकु पवार, वय 33 वर्षे, रा. सावरगांव तांडा ता.किनवट जि.नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररीत्या सिंधी दारू किंमत 3500/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/456 ओमप्रकाश लक्ष्मणराव डिडेवार, ने. पोस्टे इस्लापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 115/2025 कलम 65(ई) म.प्रो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/658 केंद्रे,** मो.नं. 9823625150 हे करीत आहेत

**3)अर्धापुर :–** दिनांक 22.09.2025 रोजी 18.15 वा. चे सुमारास, **महादेव पिंपळगांव ते देगाव जाणारे रोडवर अर्धापुर ता.अर्धापुर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी नामे बळीराम प्रकाशराव क्षिरसागर, वय 27 वर्षे, रा. नांदला दिग्रस अर्धापुर ता. अर्धापुर हा विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी व विदेशी दारू किंमत 4960/–रू चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3198 चेतन भाऊराव पांचाळ, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 555/2025 कलम 65(ई) म.प्रो.का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2215 पाटील,** मो.नं. 9223857773 हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवून शेतकरी आत्महत्या :–

**अर्धापुर :–** दिनांक 22.09.2025 रोजी चे 06.00 वा. चे पुर्वी **मौजे धामदरी ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे तातेराव भिमराव कदम, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. धामदरी ता. अर्धापुर जि. नांदेड** , यांनी सततची नापीकीला व शेतीच्या कर्जाला कंटाळुन गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार साहेबराव बालाजी कदम, वय 29 वर्षे, रा. धामदरी ता. अर्धापुर जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे अर्धापुर** आ. मृ. **40**/2025 कलम बीएनएसएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1279 चव्हाण , मो.नं. 9356283717** हे करीत आहेत.

## 6)विज पडुन मृत्यु :–

**माळाकोळी :–** दिनांक 21.09.2025 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **सावरगाव रोड माळाकोळी शिवार ता.लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे विठ्ठल संग्राम पवार, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड,** हे त्यांचे शेतात काम करत असतांना अचानक पाऊस सुरू होवुन अंगावर विज पडुन मरण पावले. वगैरे **खबर देणार शुभम संग्राम पवार, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. माळाकोळी ता. लोहा जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माळाकोळी** आ. मृ. **33**/2025 कलम 194 बीएनएसएस–2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/2308 राठोड, मो.नं. 9284536640** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड